परिवहन विभागाची “क्षमता विकास योजना” (Capacity Building Plan - CBP) तयार करण्यासाठी प्रशासकीय विभाग स्तरावरील Capacity Building Unit (Dept.-CBU) गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

परिवहन विभाग

शासन निर्णय क्रमांकः एमव्हीडी ०७२६/प्र.क्र.२५९/परि-४

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: ३ ऑगस्ट, २०२६

<u>संदर्भ :</u>

१. सदस्य, क्षमता विकास आयोग, भारत सरकार यांचे पत्र क्र. D.O.No.३४६/Member (Admin.)/CBC-२०२६, दिनांक ०६ मार्च, २०२६.
२. सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.०७/प्रशि-५, दि.१६.०४.२०२६.

<u>प्रस्तावना :</u>

राज्य शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कौशल्यात वाढ करुन त्यांना “विकसित महाराष्ट्र” उपक्रमासाठी सक्षम करणे हे शासनाचे ध्येय आहे. केंद्र शासनाच्या क्षमता विकास आयोगाच्या (CBC) संदर्भाधीन क्र.१ येथील दि.०६ मार्च, २०२६ च्या पत्रान्वये प्रत्येक विभागाने आपली स्वतंत्र “क्षमता विकास योजना” (Capacity Building Plan-CBP) तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत. केंद्र शासनाच्या सूचनेनुसार महाराष्ट्र राज्यातील सर्व शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कौशल्यात वृध्दी करण्यासाठी प्रत्येक विभागाने संवर्ग निहाय आपली स्वतंत्र “क्षमता विकास योजना” (Capacity Building Plan-CBP) तयार करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने प्रत्येक प्रशासकीय विभागाने “क्षमता विकास योजना” (Capacity Building Plan-CBP) तयार करण्यासाठी प्रशासकीय विभाग स्तरावरील Capacity Building Unit (Dept.-CBU) गठीत करण्याबाबत संदर्भाधीन क्र.२ येथील दि.१६.०४.२०२६ च्या पत्रान्वये सामान्य प्रशासन विभागाने सूचना दिल्या आहेत. त्यानुसार परिवहन विभागाची “क्षमता विकास योजना” (Capacity Building Plan-CBP) तयार करण्यासाठी प्रशासकीय विभाग स्तरावरील क्षमता विकास घटक Capacity Building Unit (Dept.-CBU) गठीत करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

परिवहन विभागाची “क्षमता विकास योजना” (Capacity Building Plan-CBP) तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे प्रशासकीय विभागस्तरावरील क्षमता विकास घटक Capacity Building Unit (Dept.-CBU) गठीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अध्यक्ष	विभागाचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
सदस्य	१. परिवहन आयुक्त २. अपर परिवहन आयुक्त ३. सह परिवहन आयुक्त (निरीक्षण व प्रशिक्षण) ४. प्रादेशिक परिवहन अधिकारी (सर्व)
सदस्य सचिव	उप सचिव, परिवहन विभाग, मंत्रालय, मुंबई

३. कर्तव्य व जबाबदाऱ्या :-

१) Capacity Building Unit (CBU) विभागातील कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाशी संबंधित गरजांचे विश्लेषण करेल आणि क्षमता विकास योजना (Capacity Building Plan) राबविण्यासाठी “नोडल संस्था” “(Nodal Body) म्हणून काम करेल.

२) विभागातील विविध संवर्गातील पदांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या विचारात घेवून त्यांच्यासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यावर आधारित क्षमता विकास आराखडा तयार करणे. हा आराखडा तयार करताना चालू आर्थिक वर्षातील उद्दिष्टे आणि भविष्यातील गरजा यांचा विचार करावा. हा आराखडा तयार करताना चालू आर्थिक वर्षातील उद्दिष्टे आणि भविष्यातील गरजा यांचा विचार करावा. तसेच यासाठी IGOT - कर्मयोगी या व्यासपीठावर उपलब्ध असलेल्या AI आधारित साधनांचा वापर करावा.

३) विभांगानी केवळ पारंपारिक प्रशिक्षणावर अवलंबून न राहता, ऑनलाईन प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष प्रशिक्षण (On-the-job training) अशा संमिश्र प्रशिक्षण पध्दतीचा अवलंब करावा.

४) राज्याने ठरवून दिलेल्या उद्दिष्टानुसार विभागाच्या क्षमता बांधणी आराखडयाची निर्मिती व अंमलबजावणी करणे, नियतकालिक आढावा घेणे.

५) IGOT - कर्मयोगी या पोर्टलवर विभागातील सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यांची नोंदणी आणि प्रशिक्षणाचे पर्यवेक्षण करणे, तसेच ऑनलाइन अभ्यासक्रम वेळेवर पूर्ण होतील आणि ऑफलाइन कार्यशाळा / प्रशिक्षणांमध्ये कर्मचाऱ्यांचा सहभाग असेल, याची खातरजमा करणे.

६) सर्व प्रकारच्या प्रशिक्षणासाठी विभागातील CBU सामान्य प्रशासन विभाग आणि यशदा यांच्याशी समन्वय साधणे.

७) क्षमता बांधणी आराखडयाच्या (CBU) प्रगतीचा आढावा घेणे व त्यानुषंगाने वेळोवेळी बैठका आयोजित करणे.

८) विभागातील सर्व संवर्गासाठी तयार करण्यात आलेल्या CBU बाबतचा अहवाल सामान्य प्रशासन विभागास सादर करणे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८०३१६३२५६४२३९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUNIL BABURAO APATE

Digitally signed by SUNIL BABURAO APATE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Home Department, 2.5.4.20=19FF433C24F38AC95F09EAA0A14F560224A1A78A80F8B940775FC013021CA5CA, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4EA86DEC92091A126823D249DF451DF3C8D235CDD7E9111D7624C78A7C95B318, cn=SUNIL BABURAO APATE
Date: 2026.08.03 16:33:57 +05'30'

(सु.बा.आपटे)

अवर सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री (परिवहन), यांचे खाजगी सचिव.
४. मा.राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव.
५. अपर मुख्य सचिव (परिवहन), मंत्रालय, मुंबई
६. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. अपर परिवहन आयुक्त, परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई
८. सह परिवहन आयुक्त (निरिक्षण व प्रशिक्षण), परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई
९. सर्व प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,
१०.निवडनस्ती/परि-४